**नि. फौ. ख. क्र.४६/२०१९**
**सरकार वि. सोमेश धुमक**
नि.क्र.

**<u>रोहा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड</u>**
**<u>यांच्या न्यायालयात</u>**

**दोषारोप**

मी एस. एस. महाले, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड तुमच्यावर

सोमेश भालचंद्र धुमक,
वय २२ वर्षे, व्यवसाय – मजूरी,
रा. सुडकोली, पो. चणेरा, ता. रोहा, जिल्हा रायगड.

खालीलप्रमाणे दोषारोप ठेवतो –

दि.२१.१२.२०१८ रोजी संध्याकाळी ०७.०० वा.च्या सुमारास या न्यायालयाच्या स्थळसिमेत, मौजे सुडकोली, पो. चणेरा, ता. रोहा येथे असलेल्या दुर्गामाता गेटजवळ तुम्ही मृत्यू होण्याचा संभव आहे असे साधन म्हणजेच स्टिलचा कडा फिर्यादीच्या डोक्यात डाव्या बाजूला तसेच गालावर डाव्या बाजूला मारून त्याला इच्छापुर्वक दुखापत पोहचविली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **३२४** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही फिर्यादीस ''तुझ्यात दम असेल तर ये आता, तुला व तुझ्या बापाला मारण्याची ताकद माझ्यामध्ये आहे, तू आता सुटलास तू कंपनीतून एकटा येतोस ना तुला कधीपण खपवून टाकीन'' अशा जीवे मारण्याच्या धमक्या देवून धाकट पटशा केला व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **५०६** अन्वये गुन्हा केला आहे.

आणि मी याद्वारे तुमच्याविरुध्द वरील गुन्हयाकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2022.07.28 16:53:43 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दिनांक २८/०७/२०२२ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीला उपरोक्त दोषारोप मराठी भाषेत वाचून व समजावून सांगीतला.

मोहोर

Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2022.07.28 16:53:52 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दिनांक २८/०७/२०२२ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.